मराठी साप्ताहिक

# युवाशक्ती एक्सप्रेस

RNI No. MAHMAR/2016/72543



रुबिना मुल्ला
कार्यकारी संपादिका
9890879757

वर्ष ७वे | अंक :२२ | रविवार दि.३१ ऑगस्ट ते शनिवार ०६ सप्टेंबर २०२५ | किंमत रू. १/- | पृष्ठ : ४

पान २ — संपादकीय — भक्ती, सांस्कृतिक वारसा ...

पान ३ — महापालिकेतील खुर्चीला गोंद?..

पान ४ — पर्यावरणपूरक गणेशोत्सवाच्या बैठकीत...

## कार्यकाळ संपता संपता धडाकेबाज ११ भरती - मनपात रोजगार हमी की भ्रष्टाचार?

वसई-विरार महानगरपालिकेत भ्रष्टाचाराचे नवे पर्व समोर आले आहे. तत्कालीन आयुक्तांची बदली १७ जुलै २०२५ रोजी झाली असतानाही, त्यांनी कार्यभार सोडण्याआधीच १८ जुलै २०२५ रोजी तब्बल ११ अतिरिक्त कॉन्ट्रॅक्ट स्टाफची नियुक्ती केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या धडाकेबाज भरतीत २ अतिरिक्त मजूर, ३ अतिरिक्त वाहनचालक, १ अतिरिक्त अर्धकुशल मनुष्यबळ, २ अतिरिक्त कक्षसेवक आणि ३ अतिरिक्त कक्षसेवीका अशा एकूण ११ जणांचा समावेश आहे.

नागरिकांचा सवाल अगदी सरळ आहे – बदलीचा आदेश लागल्यानंतर खुर्चीवर बसून एवढ्या मोठ्या प्रमाणावर ठेका कर्मचाऱ्यांची भरती करण्याची इतकी घाई का? खरंच




महानगरपालिकेला या ११ जणांची आवश्यकता होती का? की ही भरती म्हणजे जाण्याआधीच आखलेला ठेका व्यवहार होता? नागरिकांमध्ये चर्चेला उधाण आले आहे की ११ जणांचे अर्ज अचानक एका दिवसात कसे पडले? त्यांचे बायोडाटा खरंच याआधीपासून मनपाच्या कार्यालयात होते का, की आर्थिक सौदाबाजीसाठी ही अर्जपत्रे मुद्दाम तयार करून आणली गेली? महानगरपालिका अधिनियम व नियम पाळून ही भरती झाली की नाही, हा देखील गंभीर प्रश्न आहे. बदली झालेल्या अधिकाऱ्यांनी कार्यभार सोडण्याआधीच अशा प्रकारे धडाकेबाज नियुक्त्या करणे ही संशयास्पद बाब असून नागरिकांच्या कराच्या पैशांवर थेट डल्ला मारण्यासारखी आहे. 'मनपा म्हणजे रोजगार हमी योजना का?' असा थेट सवाल नागरिक करत आहेत.यामुळे आता नवीन आयुक्तांपुढे मोठे आव्हान उभे राहिले आहे. हे ११ जण कायम ठेवले गेले, तर जनतेच्या पैशावर आणखी भार येणार. पण जर चौकशी करून कारवाई केली, तर भ्रष्टाचाराला लगाम बसणार आहे. त्यामुळे या प्रकरणातून नवा आयुक्त पारदर्शकतेचा

पान नं.२वर

## महापालिकेचा ठेका घोटाळा- चार जणांना बळीचा बकरा, बाकींचं काय?

वसई-विरार : वसई-विरार शहर महानगरपालिकेतील ठेक्यावरच्या भरतीत घराणेशाही, भ्रष्टाचार आणि नातेसंबंधाला प्राधान्य दिल्याचे गंभीर आरोप होत असतानाच आता एका बातमीमुळे महापालिका प्रशासन धास्तावले आहे. मराठी वृत्त वाहिनी ने ७ ऑगस्ट २०२५ रोजी प्रसारित केलेल्या बातमी आणि स्थानिक पत्रकार युसूफ अली यांच्या खुलासाने तत्कालीन आयुक्तांच्या खाजगी वाहनचालकाच्या कुटुंबातील तब्बल चार सदस्य ठेक्यावर कार्यरत असल्याचे उघड झाले. या बातमीनंतर प्रशासनाने तडकाफडकी कारवाई करत चौघांना कामावरून कमी करण्याचा आदेश दिला. परंतु, ही कारवाई निवडक असून खरा घोटाळा झाकण्याचा प्रयत्नच असल्याचा संशय अधिक गडद




झाला आहे.सदर चौघांमध्ये कु. मानसी मधुकर राऊत या लिपिक टंकलेखक म्हणून लेखा विभागात, श्री. जितेन मधुकर राऊत हे वाहनचालक म्हणून वाहन विभागात, तर श्रीमती अपर्णा वैती व श्रीमती सृष्टी वैती या शिपाई म्हणून प्रभाग समिती चंदनसार आणि बोळींज येथे कार्यरत होत्या. हे सर्व एकाच कुटुंबातील सदस्य असल्याचे स्पष्ट होताच महापालिकेची प्रतिमा मलिन झाली. २६ ऑगस्ट २०२५ पासून त्यांना ठेक्यातून कमी करण्याचा आदेश देण्यात आला.मात्र, प्रश्न असा उपस्थित झाला आहे की फक्त चार जणांनाच का

पान नं.२वर

## १७ जणांच्या मृत्यूस सहाय्यक आयुक्त गिल्सन घोन्सालिव्स जबाबदार? भाजप शहर मंडळ अध्यक्ष मारिया दारिवाला आक्रमक

### अनधिकृत बांधकामांत अधिकाऱ्यांची हलगर्जी!

प्रतिनिधी- विरार : विरार पूर्व-विजय नगर येथील रमाबाई अपार्टमेंट इमारत दुर्घटनेला कारणीभूत वसई-विरार महापालिका प्रभाग समिती सीचे प्रभारी सहाय्यक आयुक्त गिल्सन घोन्सालिव्स यांच्याविरोधात फौजदारी गुन्हा दाखल करून त्यांना तात्काळ सेवेतून बढतर्फ करण्यात यावे, अशी मागणी भाजप शहर मंडळ अध्यक्ष मारिया (गितांजली) दारिवाला यांनी पालिका आयुक्त मनोजकुमार सूर्यवंशी यांच्याकडे केली आहे. रमाबाई अपार्टमेंट इमारत दुर्घटनेत तब्बल १७ रहिवाशांचा मृत्यू झालेला आहे. तर ९ जण जखमी झाले असून या दुर्घटनेत ६० कुटुंबांना नाहक बेघर व्हावे लागले आहे. वसई-विरार महापालिका अधिकाऱ्यांनी अनधिकृत बांधकाम आणि धोकादायक इमारतींप्रकरणी दाखवलेला निष्काळजी, बेजबाबदारपणा आणि बेफिकिरी यामुळेच निष्पाप जीवांचा बळी गेला आहे, अशी संतप्त भावना मारिया दारिवाला यांनी व्यक्त केली आहे.जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींबाबत पावसाळयापूर्वी करावयाच्या कार्यवाहीबाबत महाराष्ट्र राज्य नगरविकास विभागाने ५ नोव्हेंबर २०१५ साली शासन परिपत्रक जाहीर केलेले आहे. या परिपत्रकानुसार पालिका आणि पोलीस प्रशासनावर जबाबदारी निश्चित करण्यात आलेली आहे. याच शासन परिपत्रकाचा संदर्भ






देत वसई-विरार महापालिका प्रभाग समिती सीचे प्रभारी सहाय्यक आयुक्त गिल्सन घोन्सालिव्स यांनी २६ मे २०२५ रोजी रमाबाई अपार्टमेंट ही इमारत धोकादायक असल्याची नोटीस बजावलेली होती. सदर नोटिसीत इमारतीविषयी पाच गंभीर बाबी निदर्शनास आणून दिलेल्या होत्या.

## गिल्सन घोन्सालिव्स यांच्याविरोधात फौजदारी गुन्ह्यासह बढतर्फीची मागणी!

शिवाय; सात दिवसांच्या आत नमूद बाबींची पूर्तता करण्यास कळविलेले होते. परंतु; जमीन मालक व भोगवटादार यांनी पालिकेच्या या नोटीसीची दखल घेतलेली नव्हती. त्यामुळे प्रभारी सहाय्यक आयुक्त गिल्सन घोन्सालिव्स यांनी तात्काळ त्याच वेळी यांच्याविरोधात कार्यवाही करणे अपेक्षित होते. प्रत्यक्षात; गिल्सन घोन्सालिव्स यांनी भविष्यातील धोक्याविषयी कल्पना असतानाही आपल्या कर्तव्यात कसूर केलेली आहे. निष्काळजी, बेजबाबदारपणा आणि बेफिकिरी दाखविलेली आहे. त्यामुळे महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ च्या कलम ३ : नुसार ते शिक्षेस पात्र आहेत.विशेष म्हणजे; रमाबाई अपार्टमेंट दुर्घटनेप्रकरणी खुद्द प्रभारी सहाय्यक आयुक्त गिल्सन घोन्सालिव्स यांनीच बांधकाम व्यावसायिक नितल

पान नं.२वर

# संपादकीय...!

## भक्ती, सांस्कृतिक वारसा आणि आधुनिकतेच्या गोंगाटात हरवलेले मूळ तत्त्व

'वक्रतुण्ड महाकाय सूर्यकोटि समप्रभ।
निर्विघ्नं कुरु मे देव सर्वकार्येषु सर्वदा॥'हे स्तोत्र उच्चारले की मन क्षणात प्रसन्न होते. कोटी सूर्यांचे तेज ज्याच्या ठायी आहे, जो विघ्नांचा विनाश करतो, असा गणराय प्रत्येक घराघरात, प्रत्येक मनामनात विराजमान होतो. मातीच्या साध्या मूर्तीपासून ते गल्लोगल्लीतल्या मंडपातल्या भव्य प्रतिमांपर्यंत गणेशोत्सवाचे रूप महाराष्ट्राच्या सामूहिक जीवनाचा अविभाज्य भाग बनले आहे.मात्र, काळाच्या ओघात या उत्सवाचे स्वरूप एवढे बदलले आहे की मूळ हेतू, मूळ साधना आणि मूळ संस्कार कुठेतरी लुप्त होऊ लागले आहेत. आजच्या पिढीसमोर हा प्रश्न ठामपणे उभा आहे : आपण गणेशोत्सव भक्तीने साजरा करतोय, की केवळ दिखाव्यासाठी?१. लोकमान्य टिळकांची दूरदृष्टी : उत्सवातून स्वराज्याचा ध्यासमहाराष्ट्रातील सार्वजनिक गणेशोत्सवाची ऐतिहासिक पार्श्वभूमी विशेष महत्त्वाची आहे. पुण्यात १८९२ मध्ये भाऊसाहेब रंगारी यांनी पहिला सार्वजनिक गणेशोत्सव साजरा केला. परंतु, या उत्सवाला जनचळवळीचे आणि राष्ट्रीय प्रबोधनाचे स्वरूप दिले ते लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांनी.त्या काळात ब्रिटिश सत्तेने लोकांना एकत्र जमण्यास कठोर बंधने घातली होती. पण धार्मिक सोहळ्यांना ते थेट विरोध करू शकत नव्हते. टिळकांनी हीच संधी साधली. गणपती पूजेच्या निमित्ताने जनतेला एकत्र आणून त्यांनी स्वराज्याची बीजे रोवली. व्याख्याने, नाटकं, सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून सामाजिक प्रश्नांवर जनजागृती केली.यातून गणेशोत्सव हा फक्त धार्मिक सोहळा नव्हे तर राष्ट्रीय जागृतीचे व्यासपीठ ठरला.२. पूर्वीचा उत्सव : साधेपणा, भक्ती आणि सांस्कृतिक प्रबोधनस्वातंत्र्यानंतर अनेक दशकं गणेशोत्सव साध्या, पण समाधान देणाऱ्या वातावरणात साजरा होत होता.घराघरात लहानशा मातीच्या मूर्ती असत.सार्वजनिक मंडळांच्या मूर्ती मोठ्या असल्या तरी त्यात उंचीची स्पर्धा नसायची.भजनं, अभंग, कीर्तनं, आरत्या यांच्या गजरात आगमन व विसर्जन होत असे.सांस्कृतिक कार्यक्रमांतून समाजजागृती – व्याख्याने, संगीत मैफिली, नाटकं – होत असे.दर्शन अत्यंत सुलभ होते; भलामोठ्या रांगा वा बंदिस्त मंडप नव्हते.म्हणजे उत्सव भक्ती, सौहार्द आणि सांस्कृतिक उन्नतीचा संगम होता.३. आजचे वास्तव : दिखावा, स्पर्धा आणि व्यावसायिकतागेल्या दोन-तीन दशकांत परिस्थिती पूर्णतः बदलली आहे.गणेशमूर्तींची उंची स्पर्धा – कोणत्या मंडळाची मूर्ती किती मोठी?भव्य मंडप – रस्ते अडवून लाखो रुपयांचे सजावट सेट.लाउडस्पीकरचा दणदणाट – दिवस-रात्र कर्णकर्कश डीजे.राजकीय हस्तक्षेप – प्रत्येक मंडळामागे एखादा नेता.गर्दी आणि रांगा – दर्शनासाठी तासनतास उभे राहणारे स्त्री-पुरुष, मुलं, वृद्ध.ढकलाढकली आणि अपघात – भाविकांचा जीव धोक्यात.आज गणेशोत्सव 'श्रद्धेचा सण' राहिला नसून 'दणदणाटाचा शो' बनत चालला आहे.४. पर्यावरणावर गदा गणेशोत्सवाच्या व्यावसायिकतेने निसर्गालाही फटका बसला आहे.प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती – नद्या-समुद्र प्रदूषित.रासायनिक रंग – जलीय जीवसृष्टीचा नाश.लेझर व दिव्यांचा झगमगाट – ऊर्जेचा अपव्यय.डीजे व लाउडस्पीकर – ध्वनीप्रदूषणामुळे वृद्ध, बालकं, प्राणी त्रस्त.गणेशोत्सवाचा उद्देश आनंदाचा असताना, तो आता पर्यावरणाला घातक ठरत आहे.५. भक्ती विरुद्ध दिखावा आज लाखो भाविक मंडपात रांगा लावतात. पण प्रश्न असा आहे –८ तास रांगेत उभं राहून दर्शन घेतलं, यात खरा अभिमान कुठे?गणरायाशी जिव्हाळ्याचा आत्मिक संवाद हरवत चाललाय का?आपण गणेशभक्त आहोत की गर्दीचा भाग झालोय?श्रद्धेचा आत्मिक अनुभव आणि दिखाव्याची स्पर्धा – यांच्यातला फरक ओळखणं आता गरजेचं आहे.६. हरवलेले सांस्कृतिक प्रबोधनपूर्वी गणेशोत्सव म्हणजे सांस्कृतिक संवाद. व्याख्याने, नाटकं, संगीत मैफिली – ज्यातून समाज प्रबुद्ध होत असे. आज मोबाईल, सोशल मीडिया, डिजिटल युगामुळे हे कार्यक्रम दुर्मिळ झाले आहेत.आज मंडपात दिसतात ते प्रायोजकांचे बोर्ड, जाहिराती आणि राजकीय झेंडे.७. अपवाद : आशेचे किरण तथापि, सर्वत्रच अंधार नाही. अजूनही काही मंडळं –पर्यावरणपूरक मूर्ती वापरतात,शिस्तीत, भक्तिमय वातावरणात विसर्जन करतात,सामाजिक संदेश देणारे कार्यक्रम घेतात,प्लास्टिकमुक्त उत्सव साजरे करतात.हे अपवाद आहेत, पण ते वाढायला हवेत. ८. खरी गणेशभक्ती काय सांगते?अथर्वशीर्षात म्हटले आहे :'त्वमेव प्रत्यक्षं तत्त्वमसि।'गणेश म्हणजे बुद्धी, ज्ञान, कला, विज्ञानाचा अधिपती.गणेशोत्सव साजरा करताना आपण –एखादी कला आत्मसात केली,ज्ञान वाढवले,पर्यावरणाचा विचार केला,परोपकाराचा मार्ग धरला –तरच हा उत्सव खऱ्या अर्थाने साधला असे म्हणता येईल.९. आजची गरज : उत्सवाचा आत्मा परत मिळवणे गणेशोत्सव पुन्हा भक्ती, प्रबोधन आणि सामाजिक सौहार्दाचा उत्सव व्हावा यासाठी –पर्यावरणपूरक मूर्ती व सजावट वापरावी.ध्वनीप्रदूषणावर नियंत्रण आणावे.सांस्कृतिक, शैक्षणिक कार्यक्रमांना प्रोत्साहन द्यावे.राजकीय हस्तक्षेप रोखावा.गर्दीत सुरक्षिततेची पूर्ण काळजी घ्यावी.१०. निष्कर्ष : गणेशोत्सवाचे मूळ पुन्हा जिवंत करुया गणेश म्हणजे विघ्नहर्ता, बुद्धिदाता, करुणासागर.त्याच्या सणातून आपण जर परोपकार, ज्ञान आणि सौहार्द जोपासले नाही तर उत्सव व्यर्थ ठरेल.'हे गणेशा, तूच ज्ञानाचा अधिपती आहेस,तूच बुद्धीचा कारक आहेस.तुझ्या सणातून आमचे जीवन समृद्ध होवो,हेच खरे व्रत राहो.'आजच्या आधुनिक गोंगाटातही जर आपण हा साधा विचार मनाशी पक्का केला, तर गणेशोत्सवाला पुन्हा एकदा पूर्वीचे पावित्र्य, आनंद आणि सौहार्द मिळेल.

## कार्यकाळ संपता संपता ...पान न.१

मार्ग दाखवतो की भ्रष्टाचाराचा वारसा स्वीकारतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.शहरातील सामाजिक कार्यकर्त्यांनीही या नियुक्त्यांविरोधात आवाज उठवला आहे. 'जाण्याआधी केलेली ही धडाकेबाज भरती म्हणजे नागरिकांच्या विश्वासाला तडा देणारा प्रकार आहे. जर खरोखरच अर्ज वेळेवर आले होते, तर ते पारदर्शकतेने का दाखवले गेले नाहीत? आणि नसतील, तर हा घोटाळा मानून कारवाई झाली पाहिजे,' अशी मागणी केली जात आहे.
मनपा म्हणजे सार्वजनिक विश्वासावर उभे असलेले संस्थान. पण कार्यकाळ संपता संपता केलेल्या या ११ भरतींमुळे नागरिकांमध्ये संशयाची पाल चुकचुकू लागली आहे. भ्रष्टाचाराच्या या नव्या प्रकरणाने पुन्हा एकदा प्रशासनाच्या प्रामाणिकतेवर प्रश्नचिन्ह उभे केले असून, आता नागरिकांची नजर नव्या आयुक्तांकडे लागली आहे.

## महापालिकेचा ठेका घोटाळा ...पान न.१

लक्ष्य केले गेले? कारण वसई-विरार महापालिकेत ठेक्यावर नियुक्त केलेल्या तब्बल वीस टक्के कर्मचारी हे नातेसंबंधातूनच आले असल्याची चर्चा आहे. अनेक विभागात एकाच घरातील दोन, तीन, अगदी चारही जण कार्यरत आहेत. मग त्यांच्यावर कारवाई का नाही? महापालिकेला हे आधीच माहिती नव्हते का? की मोठ्या आर्थिक सौद्यांच्या बदल्यात डोळेझाक केली गेली?सामाजिक कार्यकर्त्या रुबिना मुल्ला यांनी प्रशासनाच्या या कारवाईवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. 'जर कायदा सर्वांसाठी समान आहे, तर फक्त एका कुटुंबातील चौघांवरच कारवाई का? सर्व ठेका कर्मचाऱ्यांची चौकशी झाली पाहिजे. एकाच कुटुंबातील आढळल्यास त्यांनाही कमी केले पाहिजे. त्यांना कामावर ठेवणाऱ्या अधिकाऱ्यांवरही कठोर शिस्तभंग कारवाई व्हावी. अन्यथा ही कारवाई ही केवळ बळीचा बकरा बनवून भ्रष्टाचार झाकण्याची पद्धत आहे,' असे त्या म्हणाल्या.नागरिकांच्याही भावना याबाबत तीव्र आहेत. लोकांचा सवाल आहे की जर खरोखर घराणेशाही व भ्रष्टाचाराविरोधात कारवाई करायचीच होती, तर उर्वरित कर्मचारी अजूनही सुरक्षित कसे राहिले? ठेक्यावर नियुक्त्या करताना अधिकाऱ्यांनी आंधळेपणाने मंजुरी कशी दिली? या भरतीमागे पैशांचा खेळ झाल्याची चर्चा जोर धरू लागली आहे. त्यामुळे प्रशासनाने केवळ माध्यमांपुढे प्रतिमा वाचवण्यासाठी चार जणांना बाहेरचा रस्ता दाखवला आणि बाकी सर्वांवर कृपादृष्टी ठेवली, असा संशय नागरिक व्यक्त करत आहेत.गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर या चौघांना अचानक रस्त्यावर आणल्यामुळे अन्याय झाल्याचे वातावरण आहे. त्याचवेळी इतर नातेसंबंधातून आलेले ठेका कर्मचारी मात्र अजूनही मजेत नोकरीत टिकून आहेत. यामुळे प्रशासनावर पक्षपातीपणाचे आरोप झाले आहेत. नागरिक म्हणतात, 'हे सगळं निवडक कारवाईचं राजकारण आहे. भ्रष्टाचार उघडकीस आल्यानंतर लोकांची दिशाभूल करण्यासाठी चारचं बलिदान दिलं, पण बाकी घोटाळा अबाधित ठेवला.'यात महत्त्वाचा मुद्दा असा आहे की, जर चार जण एकाच कुटुंबातील असल्यामुळे कमी केले गेले, तर हीच पद्धत सर्व ठेका कर्मचाऱ्यांवर लागू झाली पाहिजे. पण तसे झालेले नाही. त्यामुळे नागरिकांच्या मनात मोठा प्रश्न निर्माण झाला आहे की, खरा घोटाळा झाकला जात आहे का? खरं तर हा फक्त हिमनगाचा टोक आहे. आत दडलेली घराणेशाही, नातेसंबंध आणि आर्थिक देवाणघेवाण यांची खिचडी अजून समोर यायची आहे.नागरिकांचा ठाम आग्रह आहे की या प्रकरणाची चौकशी फक्त महापालिका प्रशासनापुरती मर्यादित न राहता लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत व्हावी. प्रत्येक ठेका कर्मचाऱ्याचा डेटा तपासून एकाच कुटुंबातील असल्यास त्यांनाही कमी केले जावे. तसेच त्यांना कामावर ठेवणाऱ्या अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करावे. कारण कायदा हा सर्वांसाठी समान आहे.आज महापालिकेने चौघांना कमी करून जबाबदारी झटकली असली तरी नागरिकांचा ठाम सवाल तसाच राहतो – बाकींचं काय? जर खरोखर भ्रष्टाचाराविरुद्ध शून्य सहिष्णुता दाखवायची असेल, तर सर्व दोषींवर समान कारवाई झाली पाहिजे. अन्यथा ही कारवाई म्हणजे निव्वळ दिखाऊ पाऊल ठरेल आणि ठेका घोटाळ्याचा उग्र वास नागरिकांच्या नाकात सतत शिरत राहील.

## जिल्हा न्यायालय वकील संघटना...पान न.४

फर्नांडिस, ॲड. अंजली पाटील, ॲड.रमेश घोन्साल्वीस, ॲड. सिद्धेश नाईक, ॲड. नेपोलियन तस्कानो, ॲड. जॉर्ज फरगोज, ॲड. शारदा पाटील, ॲड. शितल पाटील, ॲड. संतोष खळे यांच्यासह जिल्ह्यातील अनेक वरिष्ठ व कनिष्ठ वकिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.संघटनेचे आभार प्रदर्शन या यशस्वी व सलोख्याच्या निवडणुकीबद्दल सर्व पदाधिकाऱ्यांनी उपस्थित वकिलांचे आभार मानले.एकात्मता, सहकार्य आणि विकासाचा संदेश देत ही निवडणूक वसई जिल्हा न्यायालय वकील संघटनेच्या इतिहासात सकारात्मक पाऊल ठरली.

## १७ जणांच्या मृत्यूस सहाय्यक आयुक्त गिल्सन...पान न.१

साने याच्याविरोधात २७ ऑगस्ट २०२५ रोजी विरार पोलीस ठाण्यात फिर्याद दिलेली आहे. या फिर्यादीत त्यांनी अप्रत्यक्षरीत्या स्वतःच्या गुन्ह्याचीही कबुली दिलेली आहे. वसई-विरार महापालिकेत प्रभारी सहाय्यक आयुक्त म्हणून १०१६ साली गिल्सन घोन्साल्विस यांना बढती मिळालेली होती. तर २०२४ साली प्रभाग समिती सी/चंदनसार येथे त्यांची नेमणूक झालेली होती. या प्रभागात नेमणुकीस आल्यापासून विविध विभागांवर देखरेख व नियंत्रण करण्याचे काम त्यांच्यावर होते. तसेच प्रभाग समिती सीमध्ये होणाऱ्या अनधिकृत बांधकामांची माहिती प्राप्त करून त्यांच्यावर कायदेशीर कार्यवाही करण्याची जबाबदारीही त्यांची होती, ही बाब त्यांनी मान्य केलेली आहे. किंबहुना; सदर इमारतीची पाहणी करून त्याचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याबाबत संबंधित इमारतीच्या पदाधिकाऱ्यांना नोटीस पाठविण्यात आलेली होती. २६ मे २०२५ रोजी गिल्सन घोन्साल्विस यांच्या सहीने या इमारतीच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने स्ट्रक्चरल ऑडिट करून घेण्याबाबत लेखी पत्रव्यवहार करण्यात आलेला होता. परंतु इमारतीच्या पदाधिकाऱ्यांनी आजपर्यंत स्ट्रक्चरल ऑडिट केल्याबाबत कोणताही अहवाल सादर केला नाही, असा मूर्खपणाचा खुलासाही या फिर्यादीत घोन्साल्विस यांनी केला आहे.मुळात; बजावेल्या नोटिसीनंतर योग्य ती अंमलबजावणी होत नसेल तर पुढील कार्यवाही करणे, ही संबंधित अधिकाऱ्याची असते. परंतु गिल्सन घोन्साल्विस यांनी त्यात जाणीवपूर्वक; किंबहुना आर्थिक हितसंबंध जपून त्याकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे आज १७ जणांना प्राणांस मुकावे लागले आहे. संबंधित बांधकामधारकांच्या संगनमनाते घोन्साल्विस यांनी केलेली ही नियोजित हत्या आहे. त्यामुळे त्यांच्याविरोधात १७ जणांच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी फौजदारी गुन्हा दाखल करण्यात यावा. तसेच; त्यांना सेवेतून तात्काळ बडतर्फ करून त्यांनी आजपर्यंत अवैधरीत्या कमावलेल्या संपत्तीतून बाधित कुटुंबांना नुकसानभरपाई देण्यात यावी, अशी मागणी भाजप शहर मंडळ अध्यक्ष मारिया दारिवाला यांनी केली आहे.दरम्यान; या दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी वसई-विरार महापालिकेत आढावा बैठक घेतली होती. या बैठकीत हलगर्जी करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांविरोधात कारवाई करण्यात यावी, असे निर्देश त्यांनी दिलेले होते. ही बाब अधोरेखित करत या कारवाईची तातडीने अंमलबजावणी करण्यात यावी, असे मारिया दारिवाला यांनी म्हटले आहे.

# महापालिकेतील खुर्चीला गोंद?- नव्या आयुक्तांची पहिली कसोटी

वसई-विरार शहर महानगरपालिका ही महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या महानगरपालिकांपैकी एक. लाखो लोकसंख्या, कोट्यवधींचा निधी आणि शहराच्या विकासासाठीचे प्रकल्प – हे सर्व सुरळीत चालावे यासाठी महापालिकेतील प्रशासन सक्षम असणे आवश्यक आहे. मात्र, वास्तव वेगळे चित्र दाखवते. एका पदावर तीन-तीन वर्षांपेक्षा जास्त काळ बसलेले कर्मचारी व अधिकारी हेच भ्रष्टाचाराचे खरे मूळ बनले आहेत, असा नागरिकांचा आक्रोश आहे.एका खुर्चीवर दशकभर - कायद्याला धाब्यावर?

शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांमधील सेवा नियमांनुसार एखाद्या अधिकाऱ्याची किंवा कर्मचाऱ्याची बदली नियमितपणे होणे अपेक्षित आहे. कारण एकाच ठिकाणी दीर्घकाळ राहिल्यास हितसंबंध जुळतात, भ्रष्टाचाराला खतपाणी मिळते आणि जनतेचा विश्वासघात होतो. तरीही वसई-विरार महापालिकेत अनेक कर्मचारी व अधिकारी तीन वर्षांचा टप्पा ओलांडून पाच-दहा वर्षांपासून एकाच जागेवर स्थायिक आहेत. हे नियम व कायद्याच्या स्पष्ट चौकटीशी विसंगत आहे.

मार्जीत टिकवण्यासाठी पैशांचा खेळ! महापालिकेतले अनेक कर्मचारी व अधिकारी आपापल्या 'मार्जीतिल' मंडळींना एका पदावर टिकवण्यासाठी पैसे घेतात, अशी गंभीर तक्रार नागरिक करत आहेत. म्हणजेच, बदली हा अधिकार नव्हे तर पैसे मोजणाऱ्याचा 'हक्क' बनलेला आहे. या प्रकारामुळे भ्रष्टाचाराला खुले मैदान मिळाले आहे. निधीचा गैरवापर, ठेकेदारांशी जुळवाजुळव, जनतेच्या हक्काचा निधी अपहार – हे सगळे एका खुर्चीवर बसून मांडवळ घालणाऱ्या अधिकाऱ्यांमुळेच वाढते, असा रोख नागरिकांच्या तक्रारींमधून स्पष्टपणे दिसतो.

वैद्यकीय विभागातही 'स्थिर डॉक्टर'जनतेच्या आरोग्याशी निगडित वैद्यकीय विभागाची परिस्थितीही वेगळी नाही. येथेही काही डॉक्टर वर्षानुवर्षे एका ठिकाणीच बसलेले आहेत. यामुळे जनतेला दर्जेदार सेवा मिळते की 'गुप्त व्यवहार' होतात, हा प्रश्नचिन्ह नागरिक विचारत आहेत. आरोग्यसेवा ही सार्वजनिक हक्काची बाब असून, डॉक्टरांची फेरबदल नियमित होणे हीच पारदर्शकतेची पहिली पायरी आहे.पूर्व आयुक्तांनी पेरलेला भ्रष्टाचार – नवे आयुक्त कसोटीवर

याआधीच्या आयुक्तांच्या काळात बदली प्रक्रिया ढेपाळली. ज्यांनी जिथे गादी पकडली त्यांनी ती सोडली नाही. त्यामुळे महापालिकेत भ्रष्टाचाराला उघडपणे खतपाणी घातले गेले. आता प्रश्न असा आहे की, नव्या आयुक्तांनी हा वारसा चालवायचा की त्याला आळा घालायचा? जर त्यांनी पारदर्शकतेसाठी कठोर पावले उचलली, तरच नागरिकांचा विश्वास बसेल. अन्यथा, नवे आयुक्तही 'पूर्वसुरींच्या पाऊलखुणा' चालत भ्रष्टाचाराचा रक्षक ठरतील.महाराष्ट्र नगरपालिका सेवा नियम व सामान्य प्रशासन विभागाच्या परिपत्रकानुसार ३ वर्षांपेक्षा जास्त काळ एका ठिकाणी अधिकारी-कर्मचारी ठेवणे गैरप्रकार मानला जातो.बदली प्रक्रियेत पारदर्शकता ही प्रशासनाची जबाबदारी आहे.सार्वजनिक हिताला बाधा आणणारी कोणतीही स्थायिक नेमणूक ही कायदेशीरदृष्ट्या प्रश्नांकित ठरू शकते.जनतेचे प्रश्न, आयुक्तांचे उत्तर?नव्या आयुक्तांना नागरिकांकडून सरळ आव्हान आहे –एका पदावर तीन वर्षांपेक्षा जास्त काळ बसलेल्यांची बदली तातडीने करणार का?मार्जीत टिकवण्यासाठी सुरू असलेला पैशांचा खेळ उध्वस्त करणार का?वैद्यकीय विभागासह इतर विभागातील 'स्थिर मंडळींना' हलवून पारदर्शकता आणणार का?जर या प्रश्नांची उत्तरे 'होय' अशी आली तर भ्रष्टाचाराच्या मुळावर प्रहार होईल. अन्यथा, नवे आयुक्तही जनतेला फसवणाऱ्या लांबलचक यादीत भर घालतील.वसई-विरार शहराच्या विकासाचा प्रश्न हा फक्त निधीचा नाही; तो पारदर्शक व स्वच्छ प्रशासनाचा आहे. जनतेचा विश्वास हा निधीपेक्षा मोठा आहे. आज नव्या आयुक्तांच्या हाती संधी आहे – भ्रष्टाचाराची पाळेमुळे उपटून टाकण्याची.पण प्रश्न अद्याप अनुत्तरित आहे –नवीन आयुक्त भ्रष्टाचाराला आळा घालणार की पुन्हा एकदा खुर्चीवाल्यांना खतपाणी घालणार?

# विरार इमारत दुर्घटनाः १७ जणांच्या मृत्यूने हादरले वसई-विरार, शेकडो अति धोकादायक इमारती, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाकडून सातत्याने क्लस्टर रीडेव्हलपमेंटची मागणी

विरार । २६ ऑगस्ट २०२५ च्या रात्री, विरारच्या नारंगी रोडवरील विजय नगर येथील रमाबाई अपार्टमेंटमध्ये एका एकवर्षीय मुलीचा वाढदिवस साजरा होत असताना संपूर्ण कुटुंबात आनंदाचे वातावरण होते. आजूबाजूच्या रहिवाशांनी, जे या वाढदिवसात सहभागी झाले असतील, त्या मुलीच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या असतील. इमारतीतील इतर कुटुंबे गणपती बाप्पांच्या आगमन आणि स्थापनेच्या आनंदात दंग होती. परंतु, या इमारतीतील ५० घरांपैकी १२ कुटुंबांना हे माहीत नव्हते की, वसई-विरारमधील धोरणकर्ते आणि प्रशासन यांच्या अति धोकादायक इमारतींबाबत ठोस धोरण आणि अंमलबजावणीच्या अभावामुळे आणि चुकीच्या धोरणांमुळे १७ निष्पाप लोकांना मृत्यूला कवटाळावे लागेल. एकवर्षीय मुलीचा वाढदिवस काही तासांतच शोकांतिकेत बदलेल, याची कोणालाही कल्पना नव्हती ।

बातमी लिहेपर्यंत, महानगरपालिका प्रशासनाने १७ जणांच्या मृत्यूची आणि ९ जण जखमी झाल्याची पुष्टी केली आहे. या घटनेत महानगरपालिकेच्या अग्निशमन विभाग, वैद्यकीय आरोग्य विभाग, पोलिस विभाग, एनडीआरएफ आणि इतर पथकांसह स्थानिक लोकांनी संपूर्ण ताकदीने बचावकार्य (रेस्क्यू ऑपरेशन) केले. जखमींना बाहेर काढण्यात आणि मृतदेह बाहेर काढण्यात ते गुंतले होते. सामाजिक आणि राजकीय पक्षांचे कार्यकर्तेही या बचावकार्यात सहभागी होते, अशी माहिती मिळाली आहे. या घटनेमुळे संपूर्ण वसई-विरार हादरले आहे ।

बातमी लिहेपर्यंत, मंत्र्यांनी घटनास्थळाला भेट दिल्याची माहिती आहे, तसेच मुख्यमंत्र्यांनी मृतांच्या कुटुंबांना प्रत्येकी ५ लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे.

वसई-विरार शहर महानगरपालिका दरवर्षी पावसाळ्यापूर्वी सी-१ (धोकादायक) आणि सी-२ (अति धोकादायक) इमारतींच्या यादी तयार करते आणि रहिवाशांना घरे रिकामी करण्याची नोटीस बजावते. दरवर्षी अशा इमारतींची यादी जाहीर केली जाते आणि रहिवाशांना घरे रिकामी करण्याची विनंती केली जाते. तसेच, दरवर्षी सी-१ आणि सी-२ यादीत नवीन इमारतींचा समावेश होत राहतो. अनेक प्रकरणांमध्ये, रहिवाशांना पर्यायी निवासाची व्यवस्था नसल्याने आणि इमारत पडल्यास नवीन घर मिळणार नाही किंवा बेघर



होण्याची भीती असल्याने ते घरे रिकामी करत नाहीत. काही रहिवासी याबाबत कोर्टातही जातात ।

प्रादेशिक स्तरावर काम करणारे आणि क्षेत्राची चांगली माहिती असलेले पत्रकार कमर बेग २०१५ पासून सातत्याने सी-१ आणि सी-२ जर्जर इमारतींच्या बातम्या लिहून प्रशासनाला परिस्थितीची जाणीव करून देत आहेत. काही वर्षांपूर्वी, तत्कालीन उपायुक्त अजीज शेख यांच्याशी या विषयावर चर्चा झाली होती. प्रभाग समिती बीच्या क्षेत्रात एक इमारत दुसऱ्या इमारतीवर झुकल्याची माहिती त्यांनी दिली होती आणि अति धोकादायक इमारतींची अशी दयनीय अवस्था आहे की, जर हलकासा भूकंप आला तरी हजारो मृतदेह विखुरले जातील, असे सांगितले होते. यावर उपायुक्तांनी प्रभागातील अतिक्रमण विभागाच्या अभियंत्यांना पाठवले आणि तातडीने रहिवाशांना रिकामे केले गेले. त्याचप्रमाणे, हनुमान नगरातील समर्थ नगर येथे एका इमारतीचा काही भाग कोसळल्यानंतर ती रिकामी करण्यात आली होती. समर्थ नगरातील मंदिराशेजारील एक झुकलेली इमारतही रिकामी करण्यात आली होती. बचावकार्यादरम्यान उपायुक्त किशोर गवास स्वतः उपस्थित होते. अशा असंख्य घटना घडल्या आहेत ।

जर्जर झालेल्या इमारतींमध्ये वैध इमारतींसह मोठ्या प्रमाणात बेकायदा इमारतींचाही समावेश आहे. महानगरपालिकेकडे रहिवाशांसाठी पर्यायी निवासाची मोठी व्यवस्था नाही, तसेच दीर्घकाळ अन्नपाण्याची स्वतंत्र व्यवस्था करण्याचीही सुविधा नाही ।

कमर बेग, जे वरिष्ठ पत्रकार आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे वसई-विरार शहर जिल्हा मीडिया प्रमुख आहेत, गेल्या अनेक वर्षांपासून बातम्यांद्वारे आणि पत्रव्यवहारातून अति धोकादायक जर्जर इमारतींची दुरवस्था सांगत, जीव धोक्यात घालून राहणाऱ्या लोकांना वाचवण्यासाठी आणि त्यांचे क्लस्टर डेव्हलपमेंटद्वारे पुनर्विकासाद्वारे दिशा बदलण्याची विनंती प्रशासनाला सातत्याने करत आहेत ।

मागील वर्षी, २५ जुलै २०२४ रोजी मुसळधार पावसात विरार महानगरपालिका मुख्यालयासमोर पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी आणि कार्यकर्त्यांनी केलेल्या धरणे आंदोलनात एक मागणीपत्र प्रशासनाला देण्यात आले होते. यात क्लस्टर रीडेव्हलपमेंटद्वारे जर्जर झालेल्या वैध आणि बेकायदा इमारतींचे पुनर्निर्माण करून तिथे राहणाऱ्या लोकांना वाचवण्याची मागणी होती. नगररचना विभागाकडून क्लस्टर रीडेव्हलपमेंटवर काम सुरू असल्याची माहिती मिळाली आहे, परंतु ती सध्या कागदावरच मर्यादित आहे ।

विरारच्या रमाबाई इमारतीसारख्या घटनेची पुनरावृत्ती टाळण्यासाठी आणि निष्पाप लोकांचा जीव वाचवण्यासाठी क्लस्टर डेव्हलपमेंट तातडीने लागू करून काम सुरू करण्याची अत्यंत गरज आहे.

# पर्यावरणपूरक गणेशोत्सवाच्या बैठकीत 'विशिष्ट पक्षाचा कब्जा' समाजवादी पार्टीचा महापालिकेला सवाल

वसई-विरार :सोमवार, दि. २५ ऑगस्ट २०२५ रोजी वसई-विरार शहर महानगरपालिकेकडून पर्यावरणपूरक श्री गणेशोत्सव संदर्भात बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत आयुक्तांसह मनपाचे वरिष्ठ अधिकारी, महावितरण, पोलीस, अग्निशमन दल तसेच विविध गणेशोत्सव मंडळांचे प्रतिनिधी उपस्थित होते. नागरिकांना उत्तम मार्गदर्शन देण्यात आले, याबद्दल समाजवादी पार्टीने आभार मानले असले तरी बैठकीच्या आयोजनावर राजकीय पक्षपातीपणाचा आरोप करत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.समाजवादी पार्टीचे शहराध्यक्ष कुमार राऊत यांनी प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, 'महानगरपालिकेने आयोजित केलेल्या अधिकृत बैठकीत व्यासपीठावर विशिष्ट राजकीय पक्षाचे माजी आमदार व माजी महापौर बसले होते. ही बैठक सर्वपक्षीय, सर्व गणेशोत्सव



मंडळांसाठी होती, मात्र संपूर्ण व्यासपीठाचा ताबा फक्त एका पक्षाने घेतला होता. यामुळे अन्य पक्ष व समाजघटकांना दुय्यम वागणूक मिळाली.'त्यांनी प्रश्न उपस्थित केला की, 'प्रशासकीय अधिकारी मार्गदर्शन करत असताना माजी नेत्यांकडून हस्तक्षेप केला जात होता. मग महानगरपालिकेने त्यांना अशी विशेष वागणूक का दिली? जर एका पक्षाच्या नेत्यांना व्यासपीठावर स्थान दिले असेल, तर इतर पक्षांच्या पदाधिकाऱ्यांनाही व्यासपीठावर बसवायला हवे होते.'विशेष म्हणजे, वसई तालुक्याचे प्रथम नागरिक तहसीलदार अविनाश कोष्टी यांना व्यासपीठावर न बसवता खाली बसविण्यात आले, हा देखील गंभीर अपमान असल्याचे राऊत यांनी नमूद केले. 'तालुक्याचे प्रमुख प्रशासकीय अधिकारी असूनसुद्धा त्यांचा अपमान हा लोकशाहीचा अवमान आहे,' असे ते म्हणाले.कुमार राऊत यांनी महापालिकेला इशारा दिला की, 'यापुढे अशा बैठका खऱ्या अर्थाने सर्वपक्षीय व सर्वसमावेशक पद्धतीने आयोजित केल्या नाहीत, तर आम्हाला कार्यक्रमस्थळी निषेध नोंदवावा लागेल.'सोबत व्यासपीठावरील मान्यवरांचे फोटोही पुराव्यासाठी जोडण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. या प्रकरणामुळे वसई-विरार महानगरपालिकेच्या प्रशासनावर पक्षपातीपणाचा ठपका ठेवला जात असून, आगामी दिवसांत यावर राजकीय वादंग पेटण्याची शक्यता आहे

# जिल्हा न्यायालय वकील संघटना, वसई - बिनविरोध निवडणूक संपन्न

जिल्हा न्यायालय वकील संघटनेची निवडणूक यंदा सलोख्याच्या वातावरणात बिनविरोध पार पडली. गुरुवारी जिल्हा न्यायालय इमारतीतील बार रुममध्ये अत्यंत उत्साहात झालेल्या या निवडणुकीत सर्व पदाधिकारी एकमताने निवडून आले. यामुळे संघटनेतील एकात्मता आणि ऐक्याचे दर्शन घडले.

**नवीन पदाधिकारी मंडळ**

अध्यक्ष : ऍड. मोजेस रोड्रिग्ज

उपाध्यक्ष : ऍड. सारीका मोंडे

सचिव : ऍड. चेतन भोईर

खजिनदार : ऍड. गणेश वैती

सहसचिव : ऍड. अकबर मेमन

सहखजिनदार : ऍड. किरण म्हात्रे

मुळात या निवडणुका बुधवार, २०



ऑगस्ट रोजी होणार होत्या. मात्र सर्व वकिलांच्या परस्पर सहमतीने व सलोख्याने निवडणूक आधीच घेण्यात आली आणि ती बिनविरोध पूर्ण झाली.निवडणुकीत सर्व पदाधिकाऱ्यांचे वकिलांकडून जोरदार स्वागत व अभिनंदन करण्यात आले. नव्या पदाधिकाऱ्यांनी वकिलांच्या कल्याणासाठी विविध उपक्रम राबविण्याचे, तसेच न्यायालयीन कार्य अधिक सुलभ करण्याचे आश्वासन दिले.प्रमुख मान्यवरांची उपस्थिती या प्रसंगी संघटनेचे संस्थापक ऍड. विल्यम

पान नं.२वर







# सातीवली - कुवरापाडा येथे गटार साफसफाईची कारवाई; नागरिकांचा दिलासा

पावसाळ्यात पाणी साचणे, नाले तुंबणे आणि अस्वच्छतेमुळे आरोग्य धोक्यांना सामोरे जावे लागणाऱ्या सातीवली – कुवरपाडा परिसरातील नागरिकांना अखेर दिलासा मिळाला आहे. वसई-विरार शहर महानगरपालिकेकडून तातडीने गटारे साफ करण्याची आणि पाणी निचरा सुरळीत करण्याची कारवाई हाती घेण्यात आली आहे.

ही कारवाई राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार गट) चे जिल्हा सरचिटणीस रोहित रमेश ससाणे व तालुका उपाध्यक्ष कमरुद्दीन शेख यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे शक्य झाली. नागरिकांच्या वारंवार तक्रारी असूनही महापालिकेकडून योग्य प्रतिसाद न मिळाल्याने दोन्ही



नेत्यांनी प्रशासनावर दबाव आणला आणि नागरिकांच्या मूलभूत गरजांसाठी लढा उभारला.

स्थानिक नागरिकांनी या कारवाईचे स्वागत करत, 'आमच्या परिसरात महिन्यांपासून अस्वच्छता आणि पाणीसाच्याचा त्रास होता. अखेर आमच्या आवाजाला प्रतिसाद मिळाला,' असे समाधान व्यक्त केले.

या प्रकरणी बोलताना रोहित ससाणे म्हणाले –

'स्वच्छता व पाणी निचरा ही प्रत्येक नागरिकाची मूलभूत गरज आहे. हे काम करणं ही महापालिकेची जबाबदारी आहे. आम्ही जनतेच्या हितासाठी लढत राहू, जोपर्यंत प्रत्येक घराला योग्य नागरी सुविधा मिळत नाहीत.'

ही कारवाई म्हणजे जनतेच्या प्रश्नांसाठी लढणाऱ्या नेतृत्वाचा विजय असून, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) च्या लोकाभिमुख कार्यपद्धतीचे हे जिवंत उदाहरण ठरले आहे.नागरिकांनी केलेल्या कौतुकामुळे प्रशासनालाही पुढील काळात अधिक जबाबदार होण्याचा संदेश मिळाला आहे.

## युवाशक्ती एक्सप्रेस कार्यालय- ९८९०८७९७५७

वृत्तपत्रात प्रसिद्ध होणारा मजकूर आलेल्या कागदपत्रांवर आधारित असतो. त्यामुळे प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत कोणाला आक्षेप असल्यास संबंधितांनी योग्य त्या कागदपत्रांसह **युवाशक्ती एक्सप्रेस** कार्यालयाशी संपर्क साधावा. सदर पुरावे योग्य असल्यास संबंधित बातमी बाबतचा खुलासा प्रसिद्ध केला जाईल. या पत्रात प्रसिद्ध होणा-या मजकुराला मुद्रक स्थळ जबाबदार राहणार नाही.

साप्ताहिक युवाशक्ती एक्सप्रेस मते प्रसिद्ध होणा-या कोणत्याही प्रकारच्या जाहिरातींबाबत कुठल्याही प्रकारचा वाद उद्भवल्यास त्याला युवाशक्ती एक्सप्रेस व्यवस्थापन जबाबदार राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

साप्ताहिक युवाशक्ती एक्सप्रेस वृत्त प्रसिद्धी किंवा अन्य कोणत्याही तत्सम कामासाठी संपादकाशी संपर्क साधायचा असल्यास संबंधितांनी दूरध्वनी कमांक ९८९०८७९७५७ वर संपर्क साधावा.

या नोटीसी द्वारे कळविण्यात येते कि साप्ताहिक युवाशक्ती एक्सप्रेस वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणा-या जाहिराती सर्व प्रकारच्या नोटीसी याच्याशी आमचा काहीही संबंध नाही. संबंधित आणि संबंधित व्यक्तीशी परस्पर संबंध साधून त्याबाबत खात्री करावी. साप्ताहिक युवाशक्ती एक्सप्रेस वर्तमानपत्र व व्यवस्थापन याला कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.

संपादक..

Printed,Published And Owned Tushar Rajratna Gaikwad,printed At Vava ArtsB/8 Dronagiri CHS.,Tanki Road Tulinj (E) Tal-Vasai 401209,Published From Room No.10 Kadarbhai Chawl Sarvoday Vasahat Tnki Road Nallasopara (E) Tal--Vasai Dist-Palghar-401209.Editor-tushar Rajratna Gaikwad
RNI NO.MAHMAR/2016/72543. Mobile-9960144348,9890879757,yuvashaktiexpress123@gmail.com www.yuvashaktiexpress.in

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक म्हणून तुषार राजरत्न गायकवाड रु. नं. १०, कादरभाई चाळ, सर्वोदय वसाहत, आंबेडकर नगर, टाकीरोड, नालासोपारा (पुर्व), ४०१२०९. ता. वसई, जि. पालघर, येथे प्रकाशित होऊन ९८९०८७९७५७ मे. बाबा आर्टस् बी.०८, मथुरा नगर, द्रोणगिरी अपार्टमेंट, टाकी रोड, साई बाबा मंदिर जवळ, नालासोपारा (पुर्व), ४०१२०९ जि. पालघर, महाराष्ट्र येथे मुद्रित करणयात आले. मोबाईल नं. ९९६०१४४३४८
या अंकात प्रसिद्ध झालेलया बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेलया मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद वसई न्यायालयाच्या कक्षेत) Email:yuvashaktiexpress123@gmail.com www.yuvashaktiexpress.in